Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 49 – 55
DOI: 10.5281/zenodo.8332392

Original Research Article

# "पोलीस ॲक्शन" - हैद्राबाद संस्थान विलीनीकरणातील महत्वाचा टप्पा

डॉ. देवर्षी मुकुंद अरविंदराव

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३११२४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: dr.devarshima@gmail.com

Received: 10 September, 2023 | Accepted: 12 September, 2023 | Published: 13 September, 2023

जगाच्या इतिहासात अनेक राजवटी आपल्या मनगटाच्या ताकतीवर, तलवारींच्या पराक्रमांवर आणि शैर्याच्या बळावर अस्तित्वात आलेल्या दिसतात. मध्ययुगीन भारतात आसफिया वंशाची राजवट मात्र दगलबाजी, संधीसाधुपणे आणि पराभवातून आस्तित्वात आलेली दिसते. भारताची १५ ऑगस्ट १९४७ ला ब्रिटीशांच्या जुलमी अंमलातून सुटका झाली. मात्र मराठवाड्यातील जनतेला स्वातंत्र्याचा सुर्य दिसायला १७ सप्टेंबर १९४८ यावे लागले. १३ महिन्यांपेक्षा जास्त काळ संघर्ष करावा लागला. आज आपण मराठवाडा मुक्ती संग्रामाचा अमृत महोत्सव साजरा करताना, यासाठी संघर्ष कलेल्या स्वातंत्र्य योध्यांचे स्मरण करणे आवश्यक ठरते. आजच्या पिढीला पारतंत्र्याची धग, पुर्वजांनी केलेला संघर्ष व त्याग, क्रांतीकारकांचे योगदान, सार्वभौम भारताच्या एकतेसाठी दिलेले बलीदान लक्षात यावे म्हणून प्रयत्न करणे गरजेचे आहे. निझामी सत्तेने केलेले अत्याचार आणि त्यातुन भारतीय संघ राज्याची लष्करी कार्यवाही याचा आढावा प्रस्तुत लेखातुन करुन घेऊयात.

**महत्वाचे शब्द:** पोलीस ॲक्शन, हैद्राबाद संस्थान, हैद्राबाद संस्थान विलीनीकरण, निजाम, टिपू सुलतान, रझाकार

स्वातंत्र्यपूर्व भारतात ब्रिटीशांचे मांडलिक असलेली अनेक छोटी मोठी ५८५ पेक्षा जास्त संस्थाने अस्तिवात होती. या सर्व संस्थानात हैद्राबादचे निजाम संस्थान हे आकार, अधिकार व अर्थिक दृष्ट्या सर्वात मोठे होते. पहिला निजाम - उल- मुल्क ऊर्फ मीर कमरुद्दीनने हैद्राबाद येथे असफजाही वंशाची राजवट इ.स. १७४२ मध्ये स्थापन केली होती. हैद्राबाद संस्थानात आसफिया घराण्याला इ.स. १७२४ ते १९४८ असा सव्वादोनशे वर्षाचा कालावधी लाभला होता. लोकसंख्येच्या बाबतीत भारतातील हे सर्वात मोठे संस्थान होते. स्वत:चे स्वतंत्र चलन, वाहतूक व्यवस्था, पोस्ट, स्वतंत्र महसूल आणि न्यायलयीन प्रशासन व संरक्षण दल ही या संस्थानाची बलस्थाने होती. या संस्थानाच्या बाबतीत मध्ययुगीन परंपरेतून स्थिर झालेली राजेशाही, मुस्लिम राजा, बहुसंख्य हिंदू प्रजा, अल्पसंख्य

मुस्लिमांचा राजकारणातील प्रभाव व प्रशासनातील वर्चस्व व त्यातून आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील दखखनी संस्कृतीचा दबदबा, ही या संस्थानची प्रामुख्याने वैशिष्ट्ये सांगता येतील.

मीर कमरुद्दीन आसफजाह यास निजाम-अल-मुल्क म्हणजे देशाची व्यवस्था लावणारा अशा पदव्या दिल्लीच्या बादशहाने दिल्या होत्या. इ.स. १७२४ ला औरंगाबाद सुभ्याची सत्ता हस्तगत केल्यानंतर त्याने स्वतंत्रपणे कारभार सुरु केला. आसफजाही राजवटीचा ध्वज पिवळा होता व त्यावर कुलच्याचे (भाकरीचे) चिन्ह होते. हैद्राबाद संस्थान हे मोगल साम्राज्याच्या एक भाग म्हणून अस्तित्वात आलेले संस्थान होते. त्याचा निर्माता मीर कमरुद्दीनलाच चिनकिलीजखान म्हणजे छोटा तलवार बहाद्दर, निजाम उल मुल्क, आसफजाह इत्यादी पदव्या होत्या. या संस्थानच्या गादीवर नंतर निरनिराळे सात शासक आले, त्यांना हैद्राबादचे राजे निजाम म्हणूनच ओळखले गेले. या मालिकेत अंतिम सातवा निजाम म्हणून मीर उस्मान अली हा इ.स. १९११ ते इ.स. १९४८ दरम्यान कार्यरत होता.

दक्षिणेतील बलवान असलेल्या टिपू सुलतान व मराठी सत्तेची धास्ती निजामाने घेतली होती. या सत्तेच्या तिरस्कारामुळे निजामाने स्वतःचे स्वातंत्र्य गमावून इंग्रजांचे मांडलिकत्व पत्करले होते. दि. २० ऑक्टोंबर १८०० ला निजामाने इंग्रजांशी करार केला व तेंव्हापासून हैद्रबादचे रूपांतर नेहमीसाठीच संरक्षित राज्यामध्ये झाले होते. भारतातील ब्रिटीश साम्राज्याच्या केंद्रबिंदु आशा दृष्टीने हैद्राबाद संस्थानचे वर्णन केले जात होते. धूर्त ब्रिटींशांनी व-हाड सारखा प्रांत निजामाकडून स्वतःकडे घेतला होता. भारतातील राष्ट्रवादाची वाढत चाललेली धग थोपवून धरण्यासाठी या संस्थानाची ब्रिटींशांनी जडणघडण चालवली होती. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या प्रसारात आळा घालण्यासाठी जातीय मुस्लिमांना संघटीत करुन त्यांना सत्तास्थानी बसविणे व या उद्दष्टपूर्तीसाठी विश्वासू आणि निजामाला स्वतंत्र व सार्वभौम बनविने हा ब्रिटीशांचा हेतू होता, असे स्वामी रामानंद तीर्थ म्हणतात. त्याला अनुसरून अंतर्गत स्वायत्तता बिटीशांनी निजामाला बहाल केली होती व त्याचे वेगळे अस्तित्व भारतात टिकविले होते.

हैद्राबाद संस्थानच्या गादीवर शेवटचे निजाम उस्मानअली हे वयाच्या २६ व्या वर्षी इ.स. १९११ साली रितसर सत्तेवर आले. आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांची प्रसिध्दी ही श्रीमंती व कंजुषपणा अशी होती. त्याबरोबरच कायदा व सुव्यवस्थेचा तज्ञ, महत्वकांक्षी आणि पाताळयंत्री, मुत्सद्दी, चाणाक्ष राजकारणी म्हणूनही त्यांची ओळख निर्माण झ ाली होती. खरे म्हणजे, त्यांनी अतिशय कौशल्याने हैद्राबाद संस्थानचे स्वातंत्र्य जवळजवळ सिध्द करीत आणले होते. हिंदूस्थानचाच भाग असणारे स्वतंत्र, सार्वभौम हैद्राबाद नावाचे राज्य अस्तित्वात आणण्याची महत्वकांक्षा निजाने जवळ जवळ पूर्ण करीत आणली होती. योगायोगाने त्यांची ही सर्व स्वप्ने त्यांच्या मित्रांनी वेळेवर पुरेसा पाठिंबा न दिल्याने धुळीला मिळाली होती. याद्वारे निजाम हा भारतीय राष्ट्रवादाचा शत्रु, हैद्राबाद संस्थानच्या जनतेचा आणि स्वातंत्र्य आकांक्षेचा शत्रु होता. या निजामाच्या काळातच स्वातंत्र्य चळवळींना जोर वाढला होता व त्यासाठी जनमत संघटन व स्वातंत्रयाची उर्मी वाढविण्यासाठी मराठवाडा प्रदेशातील क्रांतीकारांनी आंदोलनाची धग वाढवली होती.

इ.स. १९३२ मध्ये हिंदू स्टँडींग कमिटी, इ.स. १९३५ मध्ये निजास्म सब्जेक्टस लीग या संघटनांनी सनदशीर मार्गाने संस्थानी राजकीय व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या मागण्या केल्या होत्या. त्याद्वारे सुशिक्षितांमध्ये वैचारिक मंथन घडून येत होते. ही राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी योग्य पार्श्वभूमी निर्माण होत होती. राष्ट्रीय कॉंग्रेसशी

जवळीकता असलेल्या व जातियवादापासून दूर असलेल्या स्टेट कॉंग्रेसने व्यापक, धर्मनिरपेक्ष आणि सनदशीर स्वरूपाने लढा आरंभला होता. मात्र रझवी सारख्या कट्टर धर्मवेड्या व्यक्तीने इत्तेहाद उल मुस्ल्मीन या संघटनेला रझाकारी संघटनेची जोड दिली व स्वतंत्र हैद्राबादसाठी जातीय संघर्षाला प्रोत्साहन दिले होते. त्यातून रक्तपात व दपडपशाही वाढत गेली.

हैद्राबादचे स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र निर्माण करण्यासाठी विलिनीकरण करार अमान्य केला होता. निजामाने अमेरिका, ब्राझील, पोर्तुगाल, ऑस्ट्रेलिया, इंग्लड, फ्रान्स, आदी देशात स्वत:साठी एक लॉबी तयार केली होती. त्यावरून हैद्राबादची राजनिती दडपशाही च्या मार्गाने होत होती. लष्करी बळ वाढविणे व हिंसाचार घडविणे यासाठी हैद्राबाद सरकारने हॉलंड, फ्रांस, पोर्तुगाल यांच्याकडून गोवा मार्गे आंतरराष्ट्रीय चोर सिडने कॉटन मार्फत शस्त्रे मिळविली होती. हैद्राबाद राज्य स्वतंत्र राहण्याच्या स्वप्नपूर्तीसाठी समुद्र किनारा असलेला भूभाग आपल्या ताब्यात असला तर, शस्त्रांस्त्रांची आणि भाडोत्री सैनिकांची आयात करणे निजामला सोईचे होणार होते. हैद्राबादचा निजाम तेंव्हा गोवा विकत घेण्याचा प्रयत्न करीत होता. मात्र गांधींनी असा खरेदी- विक्री व्यवहार होऊ दिला जाणार नाही असे ठणकावले. तेंव्हा, त्याने हवाई मार्गे मदत मिळविली होती. ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला तरी, हैद्राबाद स्वतंत्र राहिले व वाटाघाटीत वेळ वाढू लागले. लॉर्ड माऊंट बॅटन एक वर्षाने गर्व्हनर जनरल पदावरून जाणे व भारतीय सरसेनापती पदी भारतीय माणूस बसणे गरजेचे होते. दि. २१ जून १९४८ ला चक्रवर्ती राजगोपालचारी गव्हर्नर जनरल झाले आणि त्यानंतर तीन महिन्यातच पोलीस ॲक्शनद्वारे हा सलणारा प्रश्न निकाली काढण्याचा निर्णय घेतला. तत्पूर्वी सिमावर्ती कँम्पला संरक्षण व लुटारूंचा बंदोबस्त, नागरिंकांना संरक्षण देण्यासाठी हिंदी लष्कराने ऑपरेशन कब्बडी अंमलात आणले होते. त्यानंतर झालेल्या मुख्य पोलीस कारवाईला लष्करी संकेताप्रमाणे ऑपरेशन पोलो हे नाव देण्यात आले व कारवाई पूर्ण झाल्यानंतर त्याला कॅटरपिलर या नावाने संबोधण्यात आले होते.

माऊंट बॅटन यांच्या धोरणानुसार अनेक संस्थाने हिंदुस्थान मध्ये किंवा पाकीस्तान मध्ये सामील झाली. मात्र निमाजाने आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे घोषित केल्यामुळे राज्यातील जनतेने हैद्राबाद राज्याचे भारतीय संघराज्यात विलिनीकरण करण्यासाठी सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले होते. अखेर ०९ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय संघराज्याच्या मंत्रिमंडळाने सैन्याच्या ऑपरेशन पोलोला वरवानगी दिली. ज्यांनी निजामाचे अत्याचार पहिले, त्यांच्यासाठी ऑपरेशन पोलो म्हणजे स्वातंत्र्यसूर्यच होता. सामोपचाराचे सर्व मार्ग खुंटले तेंव्हा १३ सप्टेंबर १९४८ ला ऑपरेशन पोलो या नावाने हैद्राबादेत हिंदीस्थान सरकारला पोलीस कार्यवाही करावी लागली. संस्थानातील निजामाचे अत्याचारी व धर्मांध धोरण तसेच कासिम रझवीच्या रझाकारी दोन लक्ष निमलष्करी दलाचे अत्याचार पाहता संघ राज्यास कार्यवाही करणे गरजेचे होते. अंतरराष्ट्रीय राजकारणात निझामाणे पैसे वाटुन आपले मित्र राष्ट्र म्हणून सहाणूभूती मिळवली होती. युनो मध्ये पण सार्वभौमत्वाचा प्रश्न काश्मीर प्रमाणे मांडला होता.

पाकीस्तानचे जनक महंमद अली जीना यांचा १२ सप्टेंबर ला देहान्त झाला. पोलीस कार्यवाहीचा मुहूर्त पुढे ढकलण्यासाठी मंत्रीमंडळावर दबाव होता. तत्पुर्वी वाटाघाटी दरम्यान जून, जूलै मध्ये लष्करी कार्यवाही नक्की करण्यात आली होती; मात्र काही कारणाने ती टळली होती. त्यात पंतप्रधान नेहरुंची मनोभुमिका, गृहमंत्री सरदार पटेलांचे आजारपण, सैन्याची काश्मीर बरोबरच हैद्राबाद ही दुसरी आघाडी उघडण्याची अनीच्छा, पाकिस्तान तथा

जागतिक मुस्लीम राष्ट्र यांचा विरोध आणि संस्थानांतील जातीय समीकरणे ही त्यास कारणीभूत होती. २५ जूलै च्या सायंकाळी मद्रास येथील भाषणात नेहरूंनी लष्करी कार्यवाहीचे संकेत देतानाच, रझाकारांच्या जुलमाचा पाढा वाचला होता, आणि जरुर पडेल तर आम्ही हैद्राबादेत लष्करी कार्यवाही करु असे स्पष्ट केले होते. ०७ सप्टेंबर १९४८ ला लोकसभेतील भाषणात हैद्राबाद येथील लोक जीवन किती असुरक्षीत बनले आहे या विषयी श्वेतपत्रिकेचा आधार घेऊन वास्तव गोष्टी मांडल्या होत्या. रझाकार संघटनेवर बंदी घालावी असे निजामास सुचवले होते.

जनरल जयंतिनाथ चौधरी यानां गृहमंत्री पटेल यांनी डेहरादुन येथे विश्रांतीस असताना जानेवारी १९४८ मध्ये लष्करी कार्यवाहीस किती दिवस लागतील असे विचारले होते. चौधरींनी तेंव्हा हैद्राबाद विजयासाठी सात दिवसांचा अवधी लगेल असे सांगीतले होते. एप्रिलच्या शेवटी आर्मार्ड ब्रिगेडने झाशी सोडुन पुणे, अहमदनगर मध्ये आपला तळ न्यावा असा हुकूम दिला. लष्करी आणि नागरी प्रशासनाची समन्वय समिती ठरवण्यात आली. यास अनुकूल हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या समितीने आपल्या सिमावर्ती कॅंपांची व एकुण संघटनेची फेर रचना केली होती. डॉ. मेलकोटे यांची ॲक्शन इनचार्ज म्हणून नेमणूक करण्यात आली. देशपातळीवर अहिंसेचा आणि सत्याग्रहाचा कार्यक्रम राबवण्या-या कॉंग्रेसने हैद्राबाद मध्ये मात्र सशस्त्र आंदोनलाचा, संघर्षाचा पवित्रा घेतला होता. पोलीस कार्यवाही होण्याआधी हिंदी लष्कराचे तळ हैद्राबादच्या सरहद्दीला लागुन उभारण्यात आले. निजामी लष्कर आणि रझाकार यांच्या पासुन हिंदुस्थानी जनतेचे रक्षण करता यावे हा यापाठीमागचा उद्देश होता. हिंदी लष्कराला असाही आदेश देण्यात आला होता की, जेथून आपल्या हद्दीत हल्ले होतात तेथपर्यंत हिंदी लष्कराने जावे व मुळावर आघात करुन परत यावे. या प्रकाराच्या कृतीला हिंदी लष्कराने ऑपरेशन कबड्डी असे नाव दिले होते.

हैद्राबाद सरकार, रझाकारांचा सरकारशी काही एक संबंध नाही असे वारंवार म्हणत होते खरे, परंतु सरकार, पोलीस, रझाकार आणि लष्कर आता अगदी एकजीव झाले होते. गावे जाळणे, हिंदु व्यापा-यांना लुटणे, जत्रा-यात्रा यामध्ये लुट करणे, बाजार उध्वस्थ करणे, बलात्कार, खुण या माध्यमातुन दहशत बसवणे या बरोबरच सिमावर्ती भागातील हिंदी प्रजा आणि लष्करावर हल्ले वाढले होते. बाहेरच्या देशातुन व प्रांतातून मुस्लीम प्रजेस आणून संस्थानात आश्रय दिला जात होता. सावकारी जाच वाढला होता. याला प्रतीउत्तर म्हणून पोलीस कारवाई करण्याचे ठरले तेंव्हा त्याला ऑपरेशन पोलो असे सांकेतिक नाव देण्यात आले. त्याअंतर्गत हिंदी लष्कराच्या विविध सैन्य दलाच्या तुकड्या चाल करुन गेल्या. १३ सप्टेंबर १९४८ या दिवशी भारतीय सैन्याने ऑपरेशन पोलो सुरु केले. सरदार पटेल यांनी गुप्त पध्दतीने हि योजना राबवुन भारतीय सैन्य हैद्राबादला पाठविले. या मोहिमेला ऑपरेशन पोलो असे नाव देण्यात आले होते कारण त्यवेळी हैद्राबादमध्ये जगातील सर्वाधीक १७ पोलोची मैदाने होती. या मोहिमेचे मुख्य संचालक लेफ्टनंट जनरल महाराज राजेंद्रसिंहजी सदर्न कमांड हे होते. ऑपरेशन पोलो चे नियंत्रक, नियमन व मार्गदर्शन त्यांनीच केले. त्यांच्या मदतीला पुढील लष्करी अधिकारी होते व त्यांच्याकडे दिलेल्या विभागांचे ते प्रमुख होते.

१) मेजर जनरल जयंतिनाथ चौधरी हे सोलापूरहून प्रवेश करणा-या सशस्त्र दलाचे कमांडर होते.
२) मेजर जनरल डी.एस. ब्रार हे सोलापूरच्या उत्तरेला मुंबई विभागातील दलाचे कमांडर होते.
३) मेजर मनरल ए.ए.सुंद्रा हे मद्रास समितीचे कमांडर होते.

४) ब्रिगेडिअर शिवदत्त सिंग हे मध्यप्रांत व व-हाडकडचे कमांडर होते.
५) एअर व्हाईस मार्शल हे संपूर्ण हवाई हालचालींचे व कृतींचे नियंत्रक होते.

पूर्वेकडील विजयवाडा आणि पश्चिमेकडील सोलापूर या दोन दिशेने हल्ला करायचे ठरले. काही सैन्याने छोट्या तुकड्यांनी सीमेवर हैद्राबादी सैन्याला तैनात व्हायला भाग पाडले. याचे नेतृत्व लैफ्टनंट जनरल राजेंद्रसिंहजी, डीएसओ यांच्या हाती देण्यात आले. सोलापूरच्या हल्ल्याचे नेतृत्व मेजर जनरल चौधरी यांनी केले होते आणि त्याचे चार टास्क फोर्स बनलेले होते.

१) वेगवान इन्फंट्री - घोडदळ आणि हलका तोफखाना, स्ट्राइक फोर्स
२) स्मॅश फोर्स - आर्मर्ड युनिट्स आणि तोफखाना
३) किल फोर्स - इंन्फंट्री आणि अभियांत्रिकी युनिट
४) वीर फोर्स - इंन्फंट्री आणि अभियांत्रिकी युनिट, अँटी - टँक
५) ऐअर फोर्स - पूणे विमाणतळावूरन हल्ल्यासाठी हॉकर टेम्पेस्ट विमानांची पथके

हैद्राबादने आपल्या लष्कराची विभागणीही चार गटांत केली होती. त्यांचा सेनापती जनरल अल-इद्रुस हा होता.

१) उत्तर विभाग : औरंगाबाद, परभणी, नांदेड, आदिलाबाद आणि निजामबाद - कमांडर ब्रिगेडिअर तौफीक अली
२) पूर्व विभाग : नलगोंडा, वरंगल, करीमनगर - ब्रिगेडिअर महंमद हुसेन खान
३) दक्षिण विभाग : गुलबर्गा, रायचूर, महबूबनगर - लेफ्टनंट कर्नल अली अहमद
४) पश्चिम विभाग : बीदर, उस्मानाबाद, बीड - ब्रिगेडिअर साईदी हयीब अहमद

हैद्राबाद राज्याच्या सैन्यात सुमारे २२ हजार जवान होते जे सुसज्य आणि संघटित होते या शिवाय प्रशिक्षीत हत्यारबंद पोलीस आणि २ लाखापेक्षा जास्त प्रशिक्षीत हत्यारबंद रझाकार (स्वयंसेवक) हे होते.याच्या जोरावर कासीम रझवी हिंदी सरकारला पराभूत करुन दिल्लीच्या लाल किल्यावर आसफजाई ध्वज फडवण्याचा वल्गना करत होता. त्यांच्या सैन्यात अरब, रोहिल्ला, उत्तर भारतीय मुस्लिम आणि पठाण यांचा समावेश होता. तीन आर्मर्ड रजिमेंड (१५० रणगाडे), घोडदळ रेजिमेंट, ११ इन्फंट्री बटालियन, तोफखाना आदिचा समावेश होता. निजाम सैन्याचा सेनापती मेजर जनरल अल-इद्रुस हा अरब होता.

## लष्करी कार्यवाही

ग्वालियर लान्सर्स, मैसूर लान्सर्स, मेवाड इन्फंट्री, फोर्थ ग्वालियर इन्फंट्री, राजाराम रायफल्स, फर्स्ट मैसूर इन्फंट्री यातील सैन्य तुकड्या कमी महत्वाच्या कामा करीता तैनात केल्या होत्या. ऑगस्ट १९४८ मध्ये भारत सरकारने निजामाला भारतीय संघराज्यात सामील होण्याची अंतिम मुदत दिली, ती त्याने नाकारली. १३ सप्टेंबर १९४८ ला ऑपरेशन पोलोची सुरवात झाली. भारतीय सैन्याने आपले लष्करी आक्रमाणला सुरु केले. रझाकारांच्या नेतृत्वाखालील हैद्राबाद राज्याच्या सैन्याच्या प्रतिकाराला सामना करत भारतीय सैन्याने वेगाने हालचाल केली आणि प्रमुख शहरे आणि मोक्याची ठिकाणे ताब्यात घेतली. हैद्राबाद संस्थानात ५ भिन्न दिशांकडुन, पाच ठिकाणांहून पहाटे ०४ वाजता कार्यवाहीस प्रारंभ झाला. वायव्य दिशेला औरंगाबाद, पश्चिमेला सोलापूर, ईशान्येकडे

आदिलाबाद, दक्षिणेस कर्नूल आणि आग्नेयेस विजयवाडा आशा रोखाने लष्कर निघाले. लष्कराला हवाई दल आणि रणगाडे यांचे संरक्षणछत्र होते.

दि. १३ सप्टेंबर १९४८ सोलापूर विभागाकडून तुळजापूर जिंकले, नळदुर्गला किल्ल्याच्या अश्रयाने प्रतिकार झाला. निझामाच्या वतीने ब्रिटिश लेफ्टनंट टी. टी. मूर यांस युध्द साहित्याने भरलेल्या जीपसह हिंदी लष्कराने पकडले. औरंगाबाद विभागाकडुन जालना रस्त्याने परभणी जिल्ह्यातील कन्हेरगाव व माणिकगढ ताबा मिळवला. आदिलाबाद विभागात बल्लारशाह, नादिरा आणि श्रीरामपूर जिंकले. कर्नूल विभागात तुंगभद्रा नदीवरील पूल, गदग, हौस्पेट ही स्थाने जिंकली. बेझवाडा, विजयवाडा विभागात बोमक्कल, मुन्नगल, सुर्यापेठ आणि शहरे जिंकली. वरंगल आणि बिदर हि विमानतळेही ताब्यात घेण्यात आली. १४, १५ आणि १६ सप्टेंबर या दिवसात भारतीय लष्कराने सिकंदराबादची लढाई, बोलारमची लढाई, बासरची लढाई, मेडकची लढाई ही प्रतिकारानंतर जिंकली. रणगाडांच्या आश्रयाने आगेकुच करत सिकंदराबाद आणि हैद्राबाद शहरांना वेढा घालुन हैद्राबादचा बरासचा मुलूख ताब्यात घेतला. रझाकरांचा वतीने काही ठिकाणी कडवा प्रतीकार झाला. १७ सप्टेंबर ला हिंदी लष्कर सिकंदराबाद पासुन ५ मैल अतंरावर येवून ठेवले दु. १.३० च्या सुमारास भारतीय लष्कराचे प्रमुख जनरल राजेंद्र सिंह यांनी हैद्राबाद लष्कराचा प्रमुख जनरल अल-इद्रुस याला अखेरचा इशारा हा रेडिओद्वारे ध्वनिक्षेपित करण्यात आला. निजामाने सायंकाळी ५ वा. हैद्राबाच्या रोडिओस्टेशनवरुन भाषण केले व आपण युध्द थांबवीत असल्याची घोषणा केली. जनरल अल-इद्रुस एका रक्षकासह हिंदी लष्कराकडे आले व त्याने हैद्राबाद शरण येत आल्याचे जाहिर केले. हिंद सरकारच्या वतीने जनरल चौधरी यांनी निझामाजी शरणांगती स्विकारली. हिंदी लष्कराने हैद्राबाद शहराचा ताबा घेतला. पंतप्रधान मीर लयक अली आणि त्याचा मंत्रिमंडळास स्थानबध्द करण्यात आले. रझाकारांचा प्रमुख व इत्तेहादचा अध्यक्ष कासिम रझवी यास अटक करण्यात आली.

हिंदुस्थान सरकारला आव्हाण देणा-या निजाम आणि त्याच्या सैन्यावर केलेली कार्यवाही आवघ्या १०९ तासात संपली. या संघर्षात हैद्राबादचे सैनिक व रझाकर मिळुन १२०० च्या आसपास लोक ठार झाले तर हिंदी लष्कराच्या १० जवानांना हैतात्म मिळाले. १५००० पेक्षा जास्त रझाकर पकडण्यात आले होते नंतर त्यांची मुक्तता करण्यात आली.

भारताच्या उदरस्थानी हैद्राबादच्या रुपाने निर्माण होणारे तीसरे पाकिस्तान हिंदी सैनिकांनी नेस्तनाबुत केले त्याच बरोबर अनेक स्वातंत्रसैनिकांच्या संघर्षाने, त्यागाने, वर्चस्ववादी ईस्लमी संस्कृतीचे प्रभुत्व झागारून लावले. हिंदुस्तानला लागलेली किड संपवुन कृत्रीम निर्मितीवर उभारलेल्या हटवादी व राक्षसी निजामाच्या महत्वकांक्षेला संपवण्याची जनतेची ईच्छा पुर्ण झाली. हैद्राबादसंस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. अखंड भारताच्या दृष्टीने महत्वाचा टप्पा पुर्ण झाला.

**संदर्भ सूची**

१. भालेराव आनंत, हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, अभंग प्रकाशन नांदेड, ६-१-२०२३

२. कदम सतीश, असे झुंजलो आम्ही, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, ३-४-२०१४

३. गर्गे स. मा. (संपा.), संघर्ष, खंड एक व दोन, आ. कृ. वाघमारे स्मृती समिती, औरंगाबाद, १-१२-१९८१

४. रोडे अश्विनी, हैदराबाद मुक्तिसंग्रामात महाराष्ट्र परिषदेचे योगदान, अरुणा प्रकाशन, लातूर, १७-९-२०१७

५. कुरुंदकर नरहर, हैदराबाद विमोचन आणि विसर्जन, संपादक

६. जोशी द. प., रजत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८

७. बिंदू दि.गो., हैदराबाद राज्याचे विसर्जन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८

८. भालेराव अनंतराव, स्वामी रामानंद तीर्थ चरित्र, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, १९८९

९. स्वामी रामानंद तीर्थ, हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी, (अनु. देऊळगावकर वि. प.) पॉप्युलर प्रकाशन मुंबई, २००५

१०.जोशी द. प. (संपा.) काळाच्या पडद्याआड, खंड दोन, मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, १९९२

११.धारूरकर वि. ल., योद्धा कर्मयोगी, मराठवाडा जनता विकास परिषद, औरंगाबाद, २०१०

१२.साळुंके सतीश, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि बीड जिल्हा, परिवर्तन प्रकाशन, बीड २०१५

१३.रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११

१४.शेख एजाज, असफजाहीचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०२३